# दि. १०/११/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे

## इतिवृत्त

दिनांक १०.११.२०१४ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजीत जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती ठरल्या प्रमाणे मा. अध्यक्षा जि. प. यवतमाळ यांचे अध्यक्षते खाली घेण्यात आली, सभेस खालील प्रमाणे सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सर्वश्री / श्रीमती**

१. मा. सौ. आरतीताई फुपाटे, अध्यक्षा जिल्हा परिषद यवतमाळ
२. मा. श्री. बाळा साहेब मांगुळकर उपाध्यक्ष जि.प. यवतमाळ
३. मा. श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे सभापती जिल्हा परिषद यवतमाळ
४. मा. सौ. लताताई खांदवे सभापती जिल्हा परिषद यवतमाळ
५. मा. सौ विमलताई चव्हाण सभापती जिल्हा पिरषद यवतमाळ
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ
७. मा. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ
८. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ
९. मा. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग जि.प. यवतमाळ
१०. मा. कार्यकारी अभियंता सिंचन विभाग जि.प. यवतमाळ

**इतर आमंत्रित अधिकारी / कर्मचारी**

१. श्री. एस. आर. सवई लेखाधिकारी वित्त विभाग जि.प. यवतमाळ
२. श्री. अ.वि. लोखंडे उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग दारव्हा
३. श्री. पी. एस. जयस्वाल उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग वणी
४. श्री. के.एम. मानकर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग यवतमाळ
५. श्री. डी.पी. चौधरी उपअभियंता (यां.) यांत्रिकी उपविभाग यवतमाळ
६. श्री. व्हि. जे. वाल्दे वरिष्ठ भुवैज्ञानिक भु.सं.वि.य. यवतमाळ
७. श्री. ए. एस. बोबडे उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग यवतमाळ
८. श्री. बी. एस. बुजाडे उपअभियंता सिंचन उपविभाग पुसद
९. श्री. पी.जी. सुने उपअभियंता सिंचन उपविभाग वणी
१०. श्री. आर. के. पवार प्रतिनिधी उपअभियंता (यां.) यांत्रिकी उपविभाग यवतमाळ
११. श्री. व्हि. एन. गुजलवार उपअभियंता सिंचन उपविभाग यवतमाळ
१२. श्री. व्ही.एच. गावंडे उ.का.अ. म.जी.प्रा. ना.व ग्रा. विभाग यवतमाळ
१३. श्री. पी.जी. तुमप म.जी.प्रा. उपविभागीय अभियंता पुसद

१४.श्री. पी.जी. धुगे शाअ. म.जी.प्रा. जलव्यवस्थापन विभाग यवतमाळ
१५. श्री. शे.मा. दारळेकर उपविभागीय अभियंता म.जी.प्रा. जलव्यवस्थापन विभाग यवतमाळ
१६.श्री. संजय वानखेडे कृषी अधिकारी म.ग्रा.रो.हयो. जि.प. यवतमाळ
१७.श्री. हरिश मो. कठारे कनिष्ठ भुवैज्ञानिक पा.पु. विभाग जि.प. यवतमाळ
१८. श्री. हर्षदिप बन्सोड क.अभि. पाणी पुरवठ विभाग जि.प. यवतमाळ
१९. श्री. एच. एस. वाळके पा. पु. उपविभाग राळेगाव
२०.श्री. पी. आर. कुरळकर क.अभि.ग्रा.पा.पु. उपविभाग राळेगाव
२१.श्री.संजय गावंडे स्विय सहा. उपाध्यक्ष जि.प. यवतमाळ
२२.श्री. व्हि. बी. टाक क.अभि. पा.पु. उपविभाग पुसद
२३.कु. वंदना ढवळे स्वच्छ भारत मिशन यवतमाळ

*******

सर्व प्रथम अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यवतमाळ यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष यांचे अनुमतीने सभेचे कामकाजास खालील प्रमाणे सुरुवात केली.

**विषय क्र. १ :- दिनांक १७/१०/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास मान्यता प्रदान करणे.**

**ठराव क्र. १ :- दिनांक १७/१०/२०१४ रोजी झालेल्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास ही समिती मान्यता प्रदान करते.**

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

**विषय क्र. २ :- नळ योजनांना विद्युत पुरवठा करणे बाबत कार्यवाहीचा आढावा.**

उपरोक्त विषयाचा आढावा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी ने खालील प्रमाणे सादर केला.

त्यांनतर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग पांढरकवडा यांनी सिंगलदीप ता. पांढरकवडा येथील पाणी पुरवठा योजनेची डिमांड भरलेली आहे परंतु आता पावेतो विद्युत जुळवणी प्राप्त झालेली नसल्याचे सांगीतले. या बाबत काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली असता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी पांढरकवडा व पुसद विभागाचे कोणिही प्रतिनिधी सभेस आलेले नसल्याचे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यवतमाळचे प्रतिनिधी ने सांगीतले.

यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी पुसद व पांढरकवडा येथील कोणीही ~~प्रतिनिधी~~ सभेस उपस्थित नसल्यामुळे तेथील योजने चे विद्युत जुळवणी बाबत आढावा घेता आला नाही म्हणून मा. अध्यक्षा यांनी तिव्र नाराज व्यक्त केली. तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) यांनी अधिक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी पुसद व पांढरकवडा यांना पुढील सभेमध्ये व स्थायी समिती सभेमध्ये अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता हयांना उपस्थित राहण्या बाबत कळविण्याचे सांगीतले.

त्यानंतर कार्यकारी अभियंता पा. पु. यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेशी संबंधित अडचणी असलेल्या गावांची यादी म.रा.वि.वि.कं. यांचे प्रतिनिधीला दिली. व त्यावर त्वरीत कार्यवाही करून अहवाल देण्या विषयी सुचना दिल्या.

**विषय क्र. ३ :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

कार्यकारी अभियंता म.जी.प्रा. यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागा अंतर्गत कामाचा आढावा सादर केला.

त्यांनतर मा. सभापती श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी मारेगाव येथील योजने बाबत तसेच सावंगी येथील पाणी पुरवठा योजने बाबत माहीती विचारली असता म.जी.प्रा. चे प्रतिनिधीने मारेगाव येथील काम सुरु आहे असे सांगीतले. यावर मा. सभापती श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी मारेगाव येथील योजने बाबत खोटी माहीती सादर करण्यात येत असल्या बाबत सांगीतले. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती मा. अध्यक्षांनी १२ नोव्हे. रोजी होणा-या स्थायी समिती सभेमध्ये सदर योजनांची माहीती सादर करणे बाबत सुचना दिल्या.

त्यानंतर मा. अध्यक्षा यांनी हर्षी येथील बालेवाडीचे पाणी पुरवठा योजने बाबत मा. अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली व सदर योजने बाबत कार्यवाही त्वरीत करणे बाबत म.जी.प्रा. ला सुचना दिल्या.

त्यांनतर मा. सभापती श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी झरपट ता. वणी हे गाव पाणी टंचाई आराखडयात घेणे बाबत सुचना दिल्या. त्यानंतर चाळीस गावा बाबत काय कार्यवाही सुरु आहे अशी विचारणा म.जी.प्रा. ला केली यावर म.जी.प्रा. चे प्रतिनिधीने चाळीस गाव योजने बाबत पत्र व्यवहार सुरु असल्याचे सांगीतले.

त्यांनतर मा.अध्यक्षानी सावंगी, चिंचमंडळ ता. मारेगाव येथील कामे सुरु न झाल्या बाबत नाराजी व्यक्त केली व वरीष्ठ भवैज्ञानिक भु.सं.वि.यं. , उपअभियंता वणी हयांनी त्वरीत पाहणी करावी व वरिष्ठ भुवैज्ञानिक यांनी उदभव प्रमाणपत्र उपविभागाला द्यावे असे सांगीतले. उपविभागाचे अंदाजपत्रके पुढील सभेपुर्वी सादर करावेत असे सांगीतले. वरीष्ठ भुवैज्ञानिक यांनी

आराखडयातील व आराखडयात समाविष्ठ करावयाच्या गावांचे स्त्रोत प्रमाणपत्र त्वरीत देण्याचे निर्देश.

त्यानंतर कार्यकारी अभियंता पा. पु. यांनी ज्या गावांकडून प्रतिसाद नसेल, वारंवार पाठपुरावा करुनही उदभवाची जागा मिळत नसेल अशी गावे वगळावी लागतील असे सांगीतले. यावर झालेल्या सविस्तर चर्चेअंती अश्या गावां बाबत पुनहा एकदा प्रयत्न करुन पाहावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४:- स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत कामाचा आढावा.**

त्यानंतर संपुर्ण स्वच्छता अभियानचे प्रतिनिधीने संपूर्ण स्वच्छता अभियांना अंतर्गत कामाचा आढावा पुढील प्रमाणे सादर केला.

सन २०१४-१५ मध्ये जिल्हयाला वैयक्तीक शौचालयाचे २२६८५ एवढे एकूण उद्दीष्ट आहे. त्यापैकी APL चे १४१७४ व BPL चे ८५११ एवढे उद्दीष्ट आहे. माहे सप्टेंबर २०१४ अखेर पर्यंत APL चे २७४२ एवढे बांधकाम झाले आहे, तर BPL चे १३०१ असे एकूण ४०४३ एवढे वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाले असुन एकूण १८ % काम पुर्ण झाले असल्याची माहीती दिली. त्यानंतर संपुर्ण स्वच्छता अभियानचे प्रतिनिधीने अकुशल कामाचे पैसे देण्यात आलेले आहे, अकुशल चे देणे बाकी असल्याचे सांगीतले.

**विषय क्र. ५ :- महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाचा आढावा.**

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे प्रतिनिधीने महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामाचा आढावा खालील प्रमाणे सादर केला.

१. प्रशासकीय मान्यता दिलेल्या विहीरींची संख्या - ७२७३
२. सुरु केलेल्या विहीरींची संख्या - ४९८६
३. पुर्ण झालेल्या विहीरींची संख्या - २३६०
४. सद्यस्थितीत सुरु विहीरींची संख्या - २६२६
५. विहीरींवरील झालेला एकूण खर्च - ३५०७.५९
६. धडक सिंचन विहीरीची संख्या - ४३४६

**विषय क्र. ६ :- पाणी पूरवठा विभागा अंतर्गत कामाचा आढावा.**

त्यानंतर पाणी पुरवठा विभागा अंतर्गत तालुका निहाय कामाची माहीती संबंधीत उपअभियंता यांनी खालील प्रमाणे सादर केली.

**सन २०१३-१४ वार्षिक कृती आराखड्यामधील उद्दीष्ठीत ९५ गांवे व बिगर उद्दीष्ठीत ८२ गांवाबाबत उपविभाग / तालुका निहाय माहितीचा गोषवारा**

| उपविभागाचे नांव | तालुका | २०१३-१४ (Target ) | | २०१३-१४ (Non Target) | | प्रगतीत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजुर प्राकलन | सुरू केलेली कामे | प्रस्तावित कामे | मंजुर कामे | |
| यवतमाळ | यवतमाळ | ४ | ४ | १४ | १४ | १२ |
| | आर्णी | १३ | १३ | ३ | ३ | ०१ |
| | बाभुळगांव | १ | १ | ९ | ८ | २ |
| **एकुण** | | **१८** | **१८** | **२६** | **२५** | १५ |
| दारव्हा | दारव्हा | १ | १ | ६ | ६ | ३ |
| | नेर | २ | २ | ९ | ८ | ७ |
| **एकुण** | | **३** | **३** | **१५** | **१४** | **१०** |
| पांढरकवढा | पांढरकवडा | १ | १ | ३ | ३ | १ |
| | घाटंजी | ६ | ६ | ३ | २ | १ |
| **एकुण** | | **७** | **७** | **६** | **५** | **२** |
| राळेगांव | राळेगांव | २ | २ | ५ | ५ | ० |
| | कळंब | २ | २ | ११ | १० | ६ |
| **एकुण** | | **४** | **४** | **१६** | **१५** | **६** |
| पुसद | पुसद | २ | २ | १ | १ | १ |
| | दिग्रस | २ | २ | ४ | ४ | ४ |
| | उमरखेड | ० | ० | १ | १ | १ |
| | महागांव | ० | ० | २ | २ | २ |
| **एकुण** | | **४** | **४** | **८** | **८** | **८** |
| वणी | वणी | १ | १ | ४ | ४ | ० |
| | मारेगांव | ५ | ५ | ५ | ४ | १ |
| | झरी | ४ | ४ | २ | २ | १ |
| **एकुण** | | **१०** | **१०** | **११** | **१०** | **२** |
| **जिल्ह्याचे एकुण** | | **४६** | **४६** | **८२** | **७७** | **४३** |

त्यांनतर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग यवतमाळ यांनी नायगाव येथील पाणी पुरवठा योजने करीता सोर्स मिळत नसल्यामुळे योजनेचे काम मंजुर होऊ शकले नाही असे सांगीतले. त्यानंतर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग दारव्हा यांनी आजंती येथील पाणी पुरवठा योजनेचा पहीला हप्ता समितीस देण्यात आला आहे. परंतु समिती संबंधित कंत्राटदाराला पैसे देत नाही व काम सुध्दा करीत नसल्याचे सांगीतले.

त्यांनतर मा. अध्यक्षा यांनी उमरी ता. राळेगाव येथील पाणी पुरवठा योजने बाबत विचारणा केली यावर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग राळेगाव यांनी किरकोळ कामे वगळता सर्व कामे पुर्ण झाले आहेत. उर्वरीत कीरकोळ कामे ग्राम पंचायत मार्फत पुर्ण करण्यात येतील असे सांगीतले.

त्यानंतर मा. अध्यक्षा यांनी महागाव येथील पाणी पुरवठा योजना कधी पर्यंत पुर्ण होणार अशी विचारणा केली यावर म.जी.प्रा. चे प्रतिनिधी हयांनी योग्य माहीती दिली नाही. पुढील सभेला कार्यकारी अभियंता म.जी.प्रा. हयांनी माहीतीसह स्वतः हजर राहावे व एक महीण्यात महागावचे काम पुर्ण करावे असे निर्देश दिले.

त्यानंतर मा. अध्यक्षा यांनी हातगाव येथील पाणी पुरवठा योजने बाबत विचारणा केली असता उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग यवतमाळ यांनी हातगाव येथील पाणी पुरवठा समिती ने रु.२.८२ लक्ष चा अपहार केलेला असल्याचे सांगीतले. यावर मा. अध्यक्षांनी समिती वर गटविकास अधिकारी यांचे मार्फत कार्यवाही करणे बाबत सुचना दिल्या.

त्यांनतर मा. अध्यक्षा यांनी धनकेश्वर ता. पुसद येथील उंच टाकीचे कामा बाबत तसेच राजना यथील पाणी पुरवठा योजनेचे कामा बाबत विचारणा केली त्यावर उपअभियंता पाणी पुरवठा उपविभाग पुसद यांनी पुसद येथील उंच टाकीचे काम सुरु झाले असल्याचे व राजना येथील पाणी पुरवठा योजनेचे काम समितीने जास्त रक्कम काढल्यामुळे बंद असल्याचे सांगीतले. तसेच उमरखेड मधील शिवाजी नगर येथील पाणी पुरवठा योजनेचे काम बंद आहे. गटविकास अधिकारी यांना पुढील कार्यवाही करणे बाबत सुचना देण्यात याव्या असे सांगीतले.

त्यानंतर मा. अध्यक्षा यांनी चिंचमंडळ येथील पाणी पुरवठा योजना का बंद आहे, योजनेची काम पुर्ण करणे बाबत काही अडचणी असल्यास संबंधित सन्मा. जि.प. सदस्यांची मदत घेऊन काम पुर्ण करणे बाबत निदेश दिले.

**विषय क्र. ७ :- विदर्भ सिंचन योजने अंतर्गत कामाचा आढावा.**

त्यानंतर कार्यकारी अभियंता सिंचन विभाग यांनी विदर्भ सिंचन योजने अंतर्गत कामाचा आढावा सादर केला.

त्यानंतर मा. सभापती श्री. नरेंद्रभाऊ ठाकरे यांनी मारेगाव मध्ये कीती बंधारे अडविले आहे या बाबत माहीती विचारली. यावर का.अ. सिंचन यांनी मारेगाव मध्ये एकूण २८१ पैकी ७३ बंधा-यामध्ये पाणी अडविण्यात आले असल्याचे सांगीतले तसेच मागील ४ वर्षामध्ये एकही नविन कोल्हापुरी बंधारा झालेला नसल्याचे सांगीतले.

शेवटी सर्व चर्चेनंतर उपस्थितांनी सभेचे कामकाजात दिलेल्या सहकार्या बाबत उपकार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग हयांनी उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्षा यांचे अनुमतीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**सदस्य सचिव**
**जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती**
**तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**

**आरती फुपाटे**
**अध्यक्षा**
**जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**